।। हे सृष्टी मै तेरा आभारी हूँ ।।

रजि.नं. महाराष्ट्र/३६२६२/को. एफ-३६२१८/को.
स्थापना : २४/०३/२०१७

www.zaadfoundations.com

# झाड फौंडेशन


पिशवी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर. मो. ९०९६६०६६५४.
Email - zaadfoundation69@gmail.com


जब पर्बत सुखने लगेंगे, जब बरसात होना कम हो जाएगी,
नदीयाँ सुखने लगेंगी, पेडोंको फल लगना बंद हो जाऐंगे,
जब पंछियों का उडना कम हो जाएगा,
गर्मी,ठंड, हवा, वर्षा का प्रकोप बढेगा ।
तब हमे समजना चाहिए की, हमारे आनेवाली पिढी असुरक्षित हैं।

- महर्षी व्यास (५000वर्ष पूर्व)

इस समाज को जितनी हानी अधर्मी और मुर्ख, अज्ञानिओसे नही होती।
उससे कही अधिक हानी धर्म और विद्या जानने वालोंकी
निष्क्रियता और मौन धारण करणेसे होती हैं।

- भगवत् गीता

सजीव सृष्टी वाचविण्यासाठी व भावी पिढीला निवारा शिल्लक ठेवण्यासाठी

## सृष्टी संवर्धन चळवळ

ही काळाची गरज, गावासाठी फुफ्फुस

'एक गाव एक उद्यान - वनराई'

## पर्यावरणपुरक जीवन शैलीची लोकचळवळ

वैश्विक तापमान वाढ व वातावरणातील बदल, प्रदूषण यांचे दुष्परिणाम व वाढती लोकसंख्या पाहता ही जागतिक पर्यावरणीय सर्वात मोठी समस्या व आणीबाणी आहे. पंचमहाभुतांनी बनलेल्या या मनुष्य प्राण्याने विकासाच्या हव्यासापोटी खूप चुकीच्या पद्धतीने पृथ्वी या महाभूताला ओरबडून त्याचा छळ करुन दुखवले आहे. ३३% वनक्षेत्राची गरज असताना आता ते फक्त अल्प प्रमाणातच शिल्लक आहे. आपला भारत देश खेड्यांनी बनलेला आहे. ग्रामीन भाग हा त्याचा आत्मा आहे. जीवसृष्टि वाचवण्यासाठी व भावी पिढीला निवारा शिल्लक ठेवण्यासाठी तत्काळ उपाय योजना राबवणे अत्यंत गरजेचे आहे.

मौजे पिशवी गावची सध्याची वाढती लोकसंख्या ५००० च्या वरती पाहता तसेच ३३% वनक्षेत्रानुसार भावी पिढीसाठी "वनराई युक्त फुफ्फुस" निवारा शिल्लक ठेऊन सार्वजनिक वापरासाठी जागा शिल्लक ठेवणे अत्यंत गरजेचे व काळाची गरज आहे. तसेच मुलभूत कर्तव्यही आहे.

म्हणूनच **"विचार, वैश्विक कृती, स्थानिक वैयक्तिक प्रतिसाद"** या उक्तीप्रमाणे आपण आता स्वत:पासूनच सुरुवात करुया! हरित पिशवीसाठी कटिबद्ध होऊया !...

**लोकसभागातून एक गांव एक उद्यान निर्मिती सन २०१६ पासून** मौजे पिशवी स्थित गायरान गट क्र. ११९७ जमिनीमध्ये 'ऑक्सिजन पार्क - पिसाई देवराई' या अभियानाला सुरुवात होऊन सध्या या ठिकाणी २० पेक्षा जास्त प्रजातीची विविध प्रकारची दुर्मिळ १५०० झाडे, विविध प्रकारचा रानमेवा व दुर्मिळ पशू-पक्षी पहावयास मिळतात.

### पुढील उद्दिष्ट्ये :

१. पश्चिम घाट एक वरदान.
२. ५००० झाडांची देवराई निर्माण करणे. स्थानिक देशी औषेधी संकटग्रस्त प्रदेशनिष्ट झाडे लावणे.
३. एक गांव एक उद्यान व त्यातून स्वतः पाणी निर्मिती (गावासाठी पाण्याची दीर्घकालीन उपलब्धता )
४. औषधी वनस्पतींचे व वृक्षांचे मोठ्या प्रमाणात रोपण करुन स्थानिक पातळीवर मोफत निसर्ग उपचार केंद्राद्वारे व शिबीराद्वारे औषधी वनस्पतींची ओळख करुन देणे व प्रसार करणे. (जसा पूर्वी घरोघरी आजीबाईचा बटवा)
५. सुंदर पर्यटन स्थळ - पार्कच्या तिन्ही बाजूंनी सह्याद्रीची पर्वत रांग, व सलग्न परिसर तसेच दुर्मिळ सुहासिक वनऔषधी वनस्पतींची रोपण करणे.

६. छ. शिवाजी महाराज यांची पन्हाळ गडाहून विशाळ गडाकडे सुखरूप सुटका हा इतिहास आहे.
७. सदर पार्कमधून १० ते ३० कि.मी.पर्यंतचा भू-भाग चांगल्या प्रकारे दृष्टिक्षेपात येतो.
८. मेडिटेशन (ध्यान- धारण) योगा स्थळ, जॉगिंग ट्रॅक, चिल्र्डन पार्क व ओपन जीम निमार्ण करणे
९. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय.
१०. नैसर्गिक जलस्त्रोत वाचवण्यासाठी जलस्त्रोतांच्या सभोवताल देशी वृक्षांचे रोपण.
११. विद्यार्थ्यांना खेळांची आवड जोपासण्यासाठी मैदानांची दुरुस्ती.
१२ ओपन वाचनालय - विद्यार्थी अध्ययनासाठी प्रत्येक झाडाखाली गोल पाराची व्यवस्था.
१३. विद्यार्थी अध्ययनासाठी आठवड्यातून किमान एक वेळ गुरुकुल शाळा भरवण्यासाठी व्यवस्था.
१४. पाणी अडवा पाणी जिरवा उपक्रम. यामुळे गाव परिसरातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.
१५. दैनिक समाचार पत्र स्टँड - वृद्धांसाठी षटकोनी आकाराच्या ओपन नैसर्गिक झोपड्या.
१६. वृद्धांसाठी वॉकिंग ट्रक व त्यांची दुरुस्ती, फोर सीटर बाकडी, झोपाळे इ. व्यवस्था.
१७. सुगम संगीताची सोय - डॉ. जगदीश चंद्र घोष यांच्या सिद्धांत नुसार -वृक्षांच्या वाढीसाठी, तसेच मानवी मेंदूचे सबलीकरणासाठी, भूपाळी, भक्ती गीते
१८. पर्यटन स्थल निर्माणाच्या दृष्टीने कार्य.
१९. फार्मर व लेबर एक्सरसाईज पॉईंट - शेतीची अवजारापासून व्यायाम, उदा.फावडा चालवणे, कुदळे चालवणे. खड्डा खोदणे, माती, खडी, वाळू, फावड्याने पाटी भरणे, रोग प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी पारंपारिक व्यायाम स्थल.
२०. प्रत्येक झाडावर त्याचा तपशील उदा. आयुर्वेदिक महत्व उल्लेख.
२१. बीज बँक-वनस्पती, वनऔषधी झाडे-झुडपे यांच्या बियाणांचे दीर्घकालीन संवर्धन करणे.
२२. शासनाच्या वनवाढीच्या विविध उपक्रमामध्ये कृतीशीलसहभाग घेणे.
२३. पक्ष्यांना आकर्षित करणारी झाडे लावणे.

**२४. हे सर्व राबवत असताना सदर सार्वजनिक जागेवर निर्माण केलेल्या झाडांचे व इतर मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या प्रवृत्तींचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना, त्याचबरोबर 'ओपन बार' याही 'सोशल ईव्हील्स' (सामाजिक अपप्रवृती) थांबवण्यासाठी ही सामाजिक व वैचारीक प्रयत्न करणे**

वातावरणातील बदल महाविनाशकारी आहे. ही मानव जातीला वाचविण्यासाठी शेवटची संधी आहे.

- डॉ.जेम्स हॅनसेन (मा.संचालक, नासा-अमेरिका)

पृथ्वी प्रत्येक मानसाच्या गरजा पूर्ण करण्यास समर्थ आहे. परंतु एकाही माणसाची लालसा ती पूर्ण करू शकत नाही.

- महात्मा गांधी

ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असो द्यावे समाधान।

- संत तुकाराम महाराज

पृथ्वीवर जीवन असावे असे वाटत असेल तर, उरलेले नैसर्गिक संसाधन,
खनिज इंधन (कोळसा, तेल, वायू) हे पृथ्वीच्या पोटातच राहू द्यावे.
ही मानव जात वाचविण्यासाठी शेवटची संधी.

- डॉ.जेम्स हॅनसेन (मा.संचालक, नासा-अमेरिका)

मानवजात व सजीवसृष्टी वाचविण्यासाठी सन १७५० च्या, म्हणजे यंत्र येण्याच्या काळाच्या तुलनेत पृथ्वीच्या सरासरी तापमानात २° से. ची वाढ होऊ देता कामा नये अशी प्रतिज्ञा करुन डिसेंबर २०१५ मध्ये सर्व राष्ट्र प्रमुखांनी प्रथमच एकत्र येऊन ऐतिहासिक ‘पॅरिस करार’ केला.

- ऐतिहासिक ‘पॅरिस करार’

तापमान वाढण्याचा हा कल थोड्या काळासाठी नसून तो अजून ५० वर्षे तरी कायम राहील. डॉ.टलास यांच्या विधानाचा खरा अर्थ लक्षात घेतल्यास आता पॅरिस कराराची अंमलबजावणी केली तरीही मानवजात वाचणार नाही.

- डॉ.पेट्टेरी टलास (जागतिक हवामान संघटनेचे माजी प्रमुख)

सजीव आणि निर्जीव हे दोन्ही घटक पर्यावरणासाठी परस्पर पुरक आहेत.
पर्यावरण संवर्धनामध्ये देवराईचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. देवराईमुळे
जैवविविधता व नैसर्गिक साधन संपत्ती मोठ्या प्रमाणावर टिकून आहे.
पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक असलेले प्रमुख घटकांच्या जतनाची अत्यंत
महत्त्वाची जबाबदारी देवराई शेकडो वर्षांपासून पार पाडत आहे.

- डॉ.मधुकर बाचुळकर (ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ)

Print House, Bambavade : 9922808525